<u>अतारांकित प्रश्नोत्तरांची अकरावी यादी</u>

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**रत्नागिरी येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र उभारण्याबाबत**

**(१) १४ (२२-१२-२०१४). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना मदत व्हावी या दृष्टीने रत्नागिरी येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी उपकेंद्र अभ्यासक्रमाच्या प्रतिक्षेत असल्याने सदरचे उपकेंद्र सुरु नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यन्त कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच परिसरातील विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविणे त्यांना शैक्षणिक मार्गदर्शन व सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यासंदर्भात आतापर्यन्त कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०८-०४-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) नाही.

(४) सदर उपकेंद्रांत एम.एस्सी.रसायन शास्त्र (ऑरगॅनिक, इन ऑरगॅनिक, फीजीकल, ॲनालिटीकल) एम.एस्सी. पर्यावरणशास्त्र व पी.एच.डी. हे अभ्यासक्रम सुरु आहेत. तसेच दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (IDOL) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कामकाज सदर उपकेंद्रामार्फत केले जाते.

---

**मुंबईतील महानगरपालिकेच्या रुग्णालयात एचआयव्हीच्या औषधाचा तुटवडा होत असल्याबाबत**

**(२) ६३ (२३-१२-२०१४). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावीत (इगतपुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एचआयव्हीच्या औषधाचा तुटवडा असल्यामुळे मुंबईतील महानगरपालिकेच्या शीव, केईएम, नायर, सिध्दार्थ, आगरवाल तसेच शासनाच्या रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या एचआयव्ही रुग्णांना एक महिन्याच्या औषधाऐवजी केवळ एकच आठवड्याची औषधे दिली जात असल्यामुळे या रुग्णांचे औषधाअभावी हाल सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांना औषधाचा पुरवठा होण्याकरिता शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१५) :** (१) हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुगणालयाबाबत खरे नाही. तथापि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामधील ए.आर.टी. सेंटरकरिता महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांचेकडून औषधांचा साठा पुरविण्यात येतो. परंतु माहे सप्टेंबर, २०१४ पासून काही संस्थंना अधुनमधून तुटवडा झाला असल्याने औषधे पुरवठ्यात खंड पडू नये यासाठी ए.आर.टी. च्या रुग्णांना एक महिन्यांऐवजी पंधरा दिवसांची औषधे देण्यात आली आहेत.

(२) ज्या ए.आर.टी. सेंटरमध्ये औषधाचा साठा उपलब्ध होता त्यांचेकडून औषधे आणून ती तातडीची बाब म्हणून रुग्णांना अखंडीत वितरीत करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.ठाणे) येथील वसई किल्ल्याची अतिशय दुर्दशा झाली असल्याबाबत**

**(३) ७५ (२३-१२-२०१४). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई जि.ठाणे येथील वसई किल्ल्याची अतिशय दुर्दशा झाली असून किल्ल्यातील ऐतिहासीक हनुमान मंदिराची सुध्दा दुर्दशा होवूनही पुरातच विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई किल्ल्याची व किल्ल्यातील हनुमान मंदीराची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत तसेच दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणा-या पुरातत्व विभागावर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणती कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०३-२०१५) :** (१) व (२) वसई किल्ला, वसई जि.ठाणे हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो अधिक्षक पुरातत्वविद् , भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मंडल कार्यालय, मुंबई यांच्या अखत्यारीत येतो. सदर प्रश्नाबाबत त्यांनी दिलेल्या माहितीनुसार हे खरे नाही.

वसई किल्ल्यात दुरुस्ती व जतनाचे काम सुरु असून सदर कामे ही पुरातत्वीय संकेतानुसार अत्यंत सावधगिरीने केली जात असल्यामुळे सदरहू कामे तांत्रीक स्वरुपाची असल्याने त्यास थोडा अवधी लागत असतो, त्यामुळे या जतन व दुरुस्तीच्या कामाला जास्त कालावधी लागतो. वसई किल्ला जास्त पाऊस पडणाऱ्या क्षेत्रात असल्यामुळे दुरुस्तीचे काम पावसाळ्यात बंद असते. वसई किल्ल्यात दोन हनुमान मंदिर आहेत. या मंदिराचे बांधकाम अलीकडच्या काळातील असून हे पुर्णत: आधुनिक आहे. सदरील मंदिर हे केंद्र संरक्षित अथवा राज्य संरक्षित स्मारक नाही. सदर मंदिरे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय मुंबई यांच्या अखत्यारीत नाही. या मंदिराची जतन व दुरुस्तीचे कामे स्थानिक विश्वस्त संस्थेकडून करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील महानगरपालिकांच्या शाळांमध्ये २५-३० वर्षे शिक्षकांची नोकरी केल्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांच्या सेवानिवृत्ती वेतनाच्या फाईल्स विभागाकडे पडून असल्याबाबत**

**(४) १०४ (२३-१२-२०१४). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महानगरपालिकांच्या शाळांमध्ये २५-३० वर्षे शिक्षकांची नोकरी केल्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांच्या सेवानिवृत्त वेतनाच्या फाईल्स विभागाकडे पडून असल्याने सेवानिवृत्त शिक्षक सेवानिवृत्त वेतनापासून वंचित रहात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्त शिक्षकांना सेवानिवृत्त वेतन तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१५) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये माहे ऑक्टोबर, २०१४ च्या अखेरीस १८३ मूळ निवृत्ती वेतन दावे व ४०० सुधारीत निवृत्ती वेतन दावे प्रलंबित होते तर माहे नोव्हेंबर, २०१४ अखेरीस १८० मूळ निवृत्ती वेतन दावे व ३५१ सुधारीत निवृत्ती वेतन दावे प्रलंबित आहेत.

(२) महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या २४ प्रशासकीय अधिकारी (शाळा) विभाग कार्यालयातील निवृत्त कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन दावे व सुधारित निवृत्ती वेतन दाव्यांबाबतचे प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी प्रत्येक महिन्यांच्या २८ तारखेला शिक्षणाधिकारी

कार्यालय, दादर येथे पेन्शन अदालताचे आयोजित करण्यात येते. तसेच याबाबत महानगरपालिकेचे प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या दालनातही नियमित पेन्शन अदालत आयेजित करण्यात येते. सदर आदालतामध्ये प्रलंबित निवृत्ती वेतनाचे दावे निकाली काढण्याबाबत संबंधित अधिका-यांना मार्गदर्शन करण्यात येते. तसेच निवृत्ती वेतन / सुधारीत निवृत्ती वेतन दावे तातडीने निकाली काढण्याकरिता महानगरपालिकेच्या लेखाधिकारी (रजा पडताळणी विभाग, शिक्षणनिधी) कार्यालयातील संबंधित लेखापरीक्षक सर्व २४ प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांच्या कार्यालयांना नियमित भेटी देऊन प्रलंबित प्रकरणांचा पाठपुरावा करतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये नवीन कामे सुरु करताना कायद्याची योग्य अंमलबजावणी करण्याबाबत**

**(५) १४७ (२२-१२-२०१४). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये नवीन कामे सुरु करताना कायद्याची योग्य अंमलबजावणी होत असल्याची खात्री करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाने दिल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायद्याची योग्य अंमलबजावणी व्हावी यासाठी या प्रकल्पांसाठी कोणती यंत्रणा उभी करण्यात आली आहे तसेच तात्काळ यंत्रणा उभी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०३-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ग्रामपंचायतमार्फत होणा-या मग्रारोहयोच्या कामांकरिता कार्यान्वित यंत्रणा ग्रामपंचायतीमध्ये पूर्वीपासूनच कार्यरत आहे. त्यावर तांत्रिक अधिकारी व नियंत्रण गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचे नियंत्रण आहे. तसेच जिल्हा परिषद स्तरावरुन संनियंत्रण करण्यात येते. योजनेमध्ये नवीन कामे सुरु करताना कायद्याची योग्य अंमलबजावणी व्हावी यासाठी ग्रामरोजगार सेवक, तांत्रिक अधिकारी / कर्मचारी यांना वेळोवेळी कार्यशाळा, आढावा बैठका इ. द्वारे मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

(३) निरंक.

---

## हिंगोली जिल्ह्यातील क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीबाबत

**(६) १५४ (२२-१२-२०१४). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीबाबत जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या बैठकीत निर्णय घेतला जात नसल्याने सुमारे १ कोटी रुपयांचा निधी गत ४ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीबाबत कोणता तातडीचा निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०३-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे.
(२), (३) व (४) जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या दिनांक १२.९.२०१४ रोजीच्या बैठकीत हिंगोली जिल्हा क्रीडा संकुलातील संरक्षक भिंत, जलतरण तलाव इमारत व वसतीगृह दुरुस्तीचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## कळमनुरी (ता.जि.हिंगोली) येथील वाकोडी येथील फिडरचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत

**(७) १५७ (२३-१२-२०१४). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (ता.जि.हिंगोली) येथील वाकोडी येथील फिडरचे काम तात्काळ सुरु करावे या मागणीसाठी पाच ग्रामस्थांनी कळमनुरीत महावितरण कार्यालयासमोर उपोषण केले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिवणी फिडरला वाकोडी हे गाव जोडलेले असल्याने सदरहू परिसरात वारंवार विद्युत पुरवठा बंद होत असल्याने पिकांना पाणी देता येत नाही हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) वाकोडी गावचा वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी नविन ३ कि.मी. ११ के.व्ही. ची लाईन पायाभूत आराखडा २ योजने मध्ये प्रस्तावित करण्यात आलेली होती. सदर लाईनचे काम दिनांक १६.१२.२०१४ रोजी पूर्ण केले असून विद्यूत लाईन चालू करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत वाकोडी गावाचा वीज पुरवठा सुरळीत चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिका रुग्णालयात फुफ्फुसावर थोरॅसिक शस्त्रक्रिया करणा-या दोन मानवसेवी डॉक्टरांना तुटपुंजे मानधन मिळत असल्याबाबत**

**(८) २३१ (२३-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका रुग्णालयात क्षयरोगाच्या शेवटच्या टप्प्यातील क्षय बाधीत रुग्णाच्या फुफ्फुसावर जटील व गुंतागुंतीची थोरॅसिक शस्त्रक्रिया करणारे दोन मानवसेवी डॉक्टरांना महानगरपालिका प्रशासनाकडून तुटपुंजे मानधन देत असल्याचे माहे जुलै, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शस्त्रक्रिया करणारे देशात केवळ चार डॉक्टर असून सदरहू आठ तास चालणाऱ्या शस्त्रक्रिया करतांना रुग्ण दगावण्याची शक्यता असल्याने सदरहू या दोन डॉक्टरांच्या हाताखाली शिकण्यास कुणीही डॉक्टर येत नसल्याचे व या दोन डॉक्टरांना मुंबई महानगरपालिकेतर्फे देण्यात येत असलेले मानधन कमी असल्याने याबाबत शासन त्वरित आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही. क्षयरोग रुग्णालय समुहात न्युमॅनॅकटॉमी (Pneumonectomy), लोबॅकटॉमी (Lobectomy), डीकॉर्डीकेशन (Decordication), थोरॅकोप्लास्टी (Thoracplasty), विंडो सर्जरी (Window Surgery) आणि आय.सी.डी. (ICD) प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयात जुलै २०१४ मध्ये वा त्या दरम्यान शस्त्रक्रिया करणारे शल्यचिकित्सक शुल्कबंध व बधरीकरण तज्ञ ३, मानसेवी शल्यचिकित्सक ४, प्रोफेसर एमीरेटस शल्यचिकित्सक ३ व प्रोफेसर एमीरेटस बधरीकरण तज्ञ १ असे एकूण ११ तज्ञ डॉक्टर उपलब्ध आहेत. सद्य:स्थितीत शस्त्रक्रियेच्या कामाचा भार पाहता, सदर शल्यचिकित्सक तज्ञ डॉक्टर्स पुरेसे उपलब्ध आहेत. सदर डॉक्टरांना मुंबई महानगरपालिकेच्या नियम व परिपत्रकानुसार वाढीव मानधन देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयात रुग्णावर शस्त्रक्रियेबाबत**

**(९) २४० (२३-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्षयरोगात उपचाराचा भाग म्हणून आवश्यकतेनुसार डॉक्टराकडून पाच प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात येत असून मुंबई मनपाच्या शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयात सदरहू शस्त्रक्रियेची जबाबदारी तीनच डॉक्टरांवर असून अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी

लोकमान्य टिळक रुग्णालय सायन, केईएम व नायर रुग्णालयातील संबंधित विषयातील डॉक्टर पुढे येत नसल्याने या आधी सेवेत असलेल्या डॉक्टरांवर ताण पडत असल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी रुग्णांची होणारी गैरसोय पहाता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१५) :** (१) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिवडी येथील क्षयरोग रुग्णालय समुहात न्युमॅनॅकटॉमी (Pneumonectomy), लोबॅकटॉमी (Lobectomy), डीकॉर्डीकेशन (Decordication), थोरॅकोप्लास्टी (Thoracplasty), विंडो सर्जरी (Window Surgery) तसेच आय सी डी (ICD) या प्रकारच्या शस्त्रक्रिया केलया जातात. शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयात जुलै २०१४ मध्ये वा त्या दरम्यान शस्त्रक्रिया करणारे कार्यरत ४ मानसेवी शल्यचिकित्सक, ३ प्रोफेसर एमीरेटस शल्यचिकित्सक, १ प्रोफेसर एमीरेटसबधरीकरण तज्ञ व ३ शल्यचिकित्सक शुल्कबंध व बधरीकरण तज्ञ असे एकूण ११ शल्यचिकित्सक उपलब्ध असून ते पुरेसे आहेत.

तसेच मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात शस्त्रकियेसाठी विलंब अथवा रुग्णांची गैरसोय होत नाही. शिवडी रुग्णालयात शस्त्रक्रियेदरम्यान अडचण आल्यास रुग्णांना त्वरीत प्रमुख रुग्णालयात पाठविण्यात येऊन पुढील उपचार होतात.

मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात क्षयरोग रुग्णांसाठी लागणारी शस्त्रक्रिया नियमितपणे करण्यात येते व शस्त्रक्रियेसाठी लागणारी सुविधाव उपकरणे (अद्ययावत थोरॅकोस्कोप) हृदय शस्त्रक्रिया विभागत आहेत व या शस्त्रक्रिया नियमितपणे होतात.

(२) शिवडी रुग्णालयात आवश्यकता असेल तेव्हा प्रमुख रुग्णालयातील तज्ञ डॉक्टर्स तेथे जाऊन रुग्णसेवा करतात.

(३) प्रश्न उद्भतव नाही.

---

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले असल्याबाबत

**(१०) २९६ (२२-१२-२०१४). श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ. सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री. दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे अडीच लाख मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०३-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) अनुसूचित जाती, विभाजन, विमाप्र व इमाव प्रवर्गासाठी असलेली शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन करण्यात आलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत, ज्या अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती देय नाही त्यांचे अर्ज व ज्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज महाविद्यालयांनी समाजकल्याण कार्यालयास सादर केले नाहीत अशा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित राहिली आहेत. तसेच विजाभज, विमाप्र व इमा प्रवर्गाच्या शिष्यवृत्तीसाठी अपेक्षित तरतूदीपेक्षा कमी तरतूद मंजूर झाल्याने शिष्यवृत्ती प्रलंबित आहे.
(३) ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत त्या महाविद्यालयांना अर्ज त्वरीत सादर करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रलंबित असलेली शिष्यवृत्ती सन २०१४-१५ मध्ये मंजूर असलेल्या निधीतून प्राधान्यान अदा करण्याबाबतच्या सूचना दिनांक १ऑगस्ट, २०१४ च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील परिवहन कार्यालयात दररोज सहाशे त सातशे**
**वाहनांची नोंद केली जात असल्याबाबत**

**(११) ४६० (१५-०२-२०१५). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील दुचाकी, तीन चाकी, चार चाकी व जड वाहनांची डिलर कडून विक्री झाल्यानंतर परिवहन अधिकारी कार्यालयात दररोज सहाशे ते सातशे वाहनांची नोंदणी केली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वाहनांच्या नोंदणी शुल्कातून शासनाला वर्षाला कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाहन विक्रीनंतर शोरुम मध्ये येऊन वाहनाची तपासणी करणाऱ्या वाहन निरीक्षकापासून ते सह्या करणाऱ्या अधिकाऱ्यापर्यंत विशिष्ट रक्कम डीलरला संबंधित अधिकाऱ्यांना द्यावी लागते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील परिवहन कार्यालयातील वाहन नोंदणी ऑनलाईन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०४-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) याबाबत केंद्र शासनाने नवीन रस्ते वाहतूक व सुरक्षा विधेयक, २०१४ मधील एकत्रित (Unified) वाहन नोंदणी प्रणालीनुसार वाहन नोंदणी ऑनलाईन करणेबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुसार सदर कायदा लागू झालेनंतर महाराष्ट्र त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि. अहमदनगर) तालुक्यातील शेतकरी व घरगुती ग्राहकांना अनियमित वीज पुरवठा होत असल्याबाबत**

**(१२) ४८६ (२२-१२-२०१४). श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा (जि. अहमदनगर) तालुक्यात शेतकरी व घरगुती ग्राहकांना अनियमित वीज पुरवठा होत असल्याने बेलवंडी येथील महावितरणाच्या कार्यालयावर शेतक-यांनी दि. ११ एप्रिल, २०१४ रोजी मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कमी दाबाने वीजपुरवठा झाल्याने रोहीत्र बिघडल्यास महीना महीना महावितरणकडून दुरुस्त करुन मिळत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतपिकांना दिवसा ८ तास वीज देण्याबाबत व श्रीगोंदा तालुक्यातील वीजपुरवठा समदाबाने व सुरळीत करण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) श्रीगोंदा तालुक्यातील वीज पुरवठा समदाबाने व सुरळीत करणेबाबत महावितरणामार्फत पायाभूत आराखडा २ अंतर्गत ३३/११ के.व्ही. नविन उपकेंद्र उभारणे, उपकेंद्रात अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर उभारणे, उच्चदाब व लघुदाब वाहिनी उभारणे, नवीन वितरण रोहित्र बसविणे व वितरण रोहित्र क्षमता वाढ करणे इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

---

**राज्यातील आदिवासींच्या विद्यालयावर आदिवासी विभागाचेच नियंत्रण ठेवण्यासंदर्भात**

**(१३) ४९२ (२२-१२-२०१४). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासींच्या शाळा आणि विद्यालयावर आदिवासी विभागाचेच नियंत्रण ठेवण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१३ च्या शेवटच्या सप्ताहात घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी किती नवीन पदांची आवश्यकता भासणार आहे,
(३) ही पदे केव्हा निर्माण करण्यात येणार आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२१-०४-२०१५) :**(१), (२) व (३) राज्यातील आदिवासींच्या शाळा व विद्यालयांवर नियंत्रण ठेवणेबाबत दिनांक ९ ऑक्टोबर, २०१४ रोजी मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार एकूण १९६१ पदे निर्माण करण्यात आलेली आहेत.

अपर आयुक्त नाशिक / नागपूर / अमरावती / ठाणे यांचेअंतर्गत सदरची वर्ग १ ते ४ संवर्गातील विविध पदे सरळसेवा परिक्षा तसेच पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यात पोलीस अधिका-यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१४) ५०० (२४-१२-२०१४). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री. अनिल कदम (निफाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाढत्या गुन्हयांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असताना त्यासाठीच्या तातडीच्या उपाययोजना करण्याकडे गृह विभागाने दुर्लक्ष केले असून राज्यात जिल्हा पोलीस प्रमुखांनंतर दुय्यम दर्जाचा अधिकार असलेल्या अप्पर अधिक्षकांची १४ जिल्हयांतील तब्बल ५४ पदे तर शहर, तालुका व विभागाचे पर्यवेक्षक अधिकारी असलेल्या सहाय्यक / उपअधिक्षकांची तब्बल ३०० पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास शासनाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.
ऑगस्ट, २०१४ मध्ये अप्पर पोलीस अधिक्षक संवर्गातील ११ पदे, तसेच पोलीस उप अधिक्षक/सहायक पोलीस आयुक्त या संवर्गातील १३७ पदे ऑगस्ट, २०१४ मध्ये रिक्त होती. त्यापैकी “पोलीस उप अधिक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र)” या संवर्गातील सरळसेवेची ३७ पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. तसेच या संवर्गातील पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील सिव्हील रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना खाजगी रुग्णालयात स्थलांतरित करण्याचे होत असलेले प्रकार**

**(१५) ५०७ (२३-१२-२०१४). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील सिव्हील रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना दलालांमार्फत दिशाभुल करुन खाजगी रुग्णालयात स्थलांतरित करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिनांक ९ नोव्हेंबर, २०१३ च्या आसपास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थलांतरित केलेले रुग्ण कोणत्या खाजगी रुग्णालयात स्थलांतरित करण्यात आले, सदरील खाजगी रुग्णालयांवर व दलालांवर शासनाने काय कार्यवाही केली,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०४-२०१५) :** (१) असे प्रकार झाल्याचे आढळून आलेले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील तंत्र शिक्षण देणाऱ्या संस्थावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने आखलेली योजना**

**(१६) ५३९ (२२-१२-२०१४). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तंत्र शिक्षण देणाऱ्या संस्थावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने एक योजना आखली असून यापुढे तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थावर राज्य शासनाचे नियंत्रण राहणार असल्याचे तत्कालीन मा. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री महोदयांनी माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्या सुमारास जाहीर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्री महोदयांनी जाहिर केल्याप्रमाणे राज्यातील तंत्रशिक्षण संस्थावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या व त्यानुसार अंमलबजावणी करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०४-२०१५) :** (१) होय. राज्यातील तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या प्रवेश क्षमतेच्या वाढीबाबत व तंत्रशिक्षणाचा दर्जा राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनामार्फत बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे.

(२) तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या संस्थांना व अस्तित्वात असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमातील तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेतील वाढ/घट याबाबतच्या प्रस्तावांना मान्यता देण्याबाबतची अंमलबजावणी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्यामार्फत केली जाते.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून सदर बृहत आराखड्यानुसार राज्यातील नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था व तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेतील वाढ/घट याबाबतच्या प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई परिसरातील वन विभागाच्या जागेवर तारेचे कुंपन घालून झोपड्यांना संरक्षण देण्याबाबत**

**(१७) ६२१ (२२-१२-२०१४). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई परिसरातील वन विभागाच्या जागेवर तारेचे कुंपन घालून झोपड्यांना संरक्षण देण्याची तसेच वन विभागाच्या मोकळया जागेवर वृक्ष लागवड करण्याची लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यवनसंरक्षक, वनविभाग, मुंबई यांचेकडे दिनांक २८ जून, २०१४ तसेच यापूर्वी वारंवार मागणी केलेली होती हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रश्नी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्यापी पुर्ण झालेली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच वनविभागाची जागा संरक्षित करणे व वृक्ष लागवड करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०३-२०१५) :** (१) होय हे खरे आहे.

(२) रिट याचिका क्र. ३०५/९५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दितील १.१.१९९५ पूर्वीच्या झोपडयांचे पुनर्वसन करुन व त्यानंतरच्या अपात्र झोपडयांचे निष्कासन करुन, मोकळ्या झालेल्या जागेवर वनविभागामार्फत सन २००८ ते सन २०१३ पर्यंत ९० हे. क्षेत्रात सुमारे २,०८,५०० रोपांची लागवड करण्यात आली आहे. तसेच माहे जुलै २०१४ मध्ये डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान या संस्थेमार्फत व मेट्रो रेल्वेमार्फत १२ हे. क्षेत्रात सुमारे १२,००० रोपांची लागवड करण्यात आली आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीवर सिमेंट कॉक्रीटची सलोह भिंत बांधणेचे काम सुरु आहे. आतापर्यंत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीवर २९.२७ कि.मी. भिंत बांधण्यात आली आहे. तसेच सन २०१४ मध्ये संजयनगर येथे झोपडया निष्कासीत केलेल्या हद्दीवर तारेचे कुंपन घालण्यात आले आहे.

(३) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीवर काही ठिकाणी पात्र अतिक्रमकांच्या झोपडया असल्याने त्यांचे पुनर्वसन करुन सदर जागा मोकळी होईपर्यंत हद्दीवर भिंत बांधता आलेली नाही. हद्दीवरील सदर पात्र झोपड्यांचे पुनर्वसन केलेनंतर त्याठिकाणी सिमेंट कॉक्रींटची सलोह भिंत बांधण्यात येणार आहे.

---

**मुंबई महापालिकेच्या कामगार आस्थापनेसाठी सन २००९ मध्ये कामगारांची घेण्यात आलेल्या परिक्षेत पास झालेल्या व प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात आलेल्या पास उमेदवारांना कामावर घेण्याचे आश्वासन देऊनही कामांवर घेण्यात न आल्याबाबत**

**(१८) ६४४ (२३-१२-२०१४). श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा-कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या कामगार आस्थापनेसाठी सन २००९ मध्ये कामगारांच्या घेण्यात आलेल्या परिक्षेत पास झालेल्या व प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात आलेल्या पास उमेदवारांना कामावर घेण्याचे आश्वासन देऊन माहे ऑगस्ट, २०१४ अखेर कामांवर घेण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार प्रतिक्षा यादीवर असलेल्या उमेवारांन नियुक्ता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१५) :** (१) हे खरे आहे. सन २००९ राजी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कामगार/कक्ष परिचर/आया/ हमाल यांची ३९१६ रिक्त पदे भरण्यासाठी सार्वजनिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या पात्र अर्जदारांची सन २०११ मध्य शारिरीक चाचणी आणि लेखी परीक्षा घेण्यात येऊन जास्तीत जास्तीत गुण आणि वयाची ज्येष्ठता या निवडीच्या निकषानुसार प्रवर्गनिहाय निवड्यादी प्रसारित करुन उमेदवारांना नियुक्तीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध रुग्णालये आणि आरोग्य खात्यामध्ये पाठविण्यात आले होते. कामगारांच्या घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून प्रवर्गनिहाय गुणवत्तेनुसार व वयाच्या ज्येष्ठतेनुसार ३९१६ उमेदवारांना नियुक्तीकरीता विविध खाते/विभाग/रुग्णालयात पाठविण्यात आले. तथापि उपरोक्त गुणवत्ता यादीची विधीग्राह्यता संपलेली असल्यामुळे सदर गुणवत्ता यादी व्यपगत झालेली आहे. त्यामळे उर्वरित उमेदवारांचा विचार करणे बृहन्मुंबई महानगरपालिकेस शक्य नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई घाटकोपर येथील कातवडीपाडा-खंडोबा टेकडीवरील रहिवाश्यांच्या पुनर्वसनाबाबत**

**(१९) ६४६ (२३-१२-२०१४). श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई घाटकोपर येथील कातवडीपाडा-खंडोबा टेकडीवरील रहिवाशी पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टेकडीवरील रहिवाश्यांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१५) :** (१) घाटकोपर (प.) येथील कातवडीपाडा खंडोबा टेकडी हा भाग प्रामुख्याने झोपडपट्टीने व्याप्त आहे. सदर टेकडीच्या काही भागातून मुंबई शहरास पाणी पुरवठा करणा-या मुख्य प्रमुख जलवाहिन्यांपैकी एक असलेली तानसा जलवाहिनी जात आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर जलवाहिनीच्या दोन्ही बाजूस १० मीटर इतकया पट्ट्यामध्ये बाधित असणा-या झोपडीधारकांना सन २००९-१० मध्ये नोटीसा बजावण्यात आल्या होत्या.

सदर नोटीसींवर झोपडीधारकांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे व शासन निर्णयानुसार पर्यायी पुनर्वसनासाठी झोपड्यांची पात्रता व अपात्रता निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसनाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(२) तानसा प्रकल्पामध्ये रहिवाश्यांचे पुनर्वसनाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेची अंतिम टप्प्यात आली असून पात्र झोपडीधारकांना पी.ए.पी. ची ताबापत्र देण्याचे काम पूर्णत्वास आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीमुंबई तसेच ठाणे जिल्ह्यातील महावितरणकडून रेडिओ फ्रिक्वेन्सी मीटर बसविण्यात आल्यामुळे ग्राहकांना जादा दराने येत असलेली वीज देयके

**(२०) ७१५ (२२-१२-२०१४). श्री. मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीमुंबई तसेच ठाणे जिल्ह्यातील वीजचोरी रोखण्यासाठी लोकांची मागणी नसतानाही महावितरणकडून रेडिओ फ्रिक्वेन्सी मीटर बसविण्यात आल्यामुळे वीज ग्राहकांना भरमसाठ वीज देयकांचा भूर्दंड सहन करावा लागत असल्याने याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी व विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी माहे डिसेंबर-जानेवारी २०१३-१४ या कालावधीत महावितरणाच्या कार्यालयावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) तसेच वीज मीटर बंदच्या नावाखाली वीज ग्राहकांना सर्रास ॲवरेझ बिले पाठविली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार चुकीचे रिडींग दाखविणारी रेडिओ फ्रिक्वेन्सी मीटर बदलण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे. रेडिओ फ्रिक्वन्सी मीटर बसविण्यात आल्यामुळे वीज ग्राहकांना भरमसाठ वीज देयकांचा भूर्दंड सहन करावा लागत नसून नवी मुंबई तसेच ठाणे जिल्ह्यातील वाशी मंडळांतर्गत ऐरोली, ठाणे मंडळातंर्गत ठाणे विभाग, कल्याण १ मंडळांतर्गत डोंबिवली विभाग येथे आर.एफ मिटर बसविण्यात आल्याने ग्राहक तक्रारींबाबत सन २०१३-१४ या कालावधीत मोर्चे काढण्यात आले होते.

(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महापालिकेने पाणी बिल थकविणाऱ्या खाजगी व सरकारी थकबाकीदारांची नावे जाहीर केल्याबाबत**

**(२१) ७७८ (२३-१२-२०१४). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेने पाणी बिलाची रक्कम थकविणाऱ्या थकबाकीदारांना सूट देण्यासाठी महापालिकेने अभय योजना सुरू केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत किती थकबाकीदारांना किती रकमेची सूट दिली, त्यामुळे किती थकबाकी वसूल करण्यात आली,

(३) अद्यापही खाजगी व सरकारी थकबाकीदारांकडे किती रकमेची थकबाकी वसूल होण्याची आहे,

(४) थकबाकी वसुलीबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१५) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने पाणी बिलाच्या थकबाकीचा मोठ्या प्रमाणावर भरणा करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी अतिरिक्त आकाराची (दंड) रक्कम माफ करणारी अभय योजना दिनांक १६.०६.२०१४ ते दिनांक २१.११.२०१४ या काळात राबविली होती.

(२) अभय योनजेअंतर्गत ८६,८१५ जलदेयक ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेताल. अभय योजनेच्या काळात रु.२३४.८७ कोटी रकमेच्या जलदेयकांची वसुली झाली त्यातील रु.१६४.५५ कोटी एवढ्या रकमेची प्रत्यक्ष वसुली झाली व रुपये ७०.३२ कोटी एवढ्या रकमेचा अतिरिक्त आकार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माफ करण्यात आला.

(३) दिनांक ३१.१२.२०१४ रोजी दंडाच्या रकमेसह खाजगी थकबाकीदारांकडे रु.७१०.१७ कोटी व सरकारी थकबाकीदारांकडेक रु.३९१.३९ कोटी इतकी थकबाकी आहे.

(४) सर्व थकबाकीदारांना जलदेयकामध्येच बिलाचा भरणा विहित कालावधीत करण्यासंबंधी सूचना दिल्या जातात व त्यानुसार पूर्तता न झाल्यास थकबाकीदारांच्या जलजोडण्या महानगरपालिकेतर्फे नियमानुसार खंडीत केल्या जातात.

---

**धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यातील नदीच्या काठावरील गावांमधील ग्रामीण रस्त्यांना पावसाळ्यात तडे जात असल्याबाबत**

**(२२) ८११ (२२-१२-२०१४). श्री. जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यातील नदीच्या काठावरील गावांमध्ये असणा-या काळी मातीमध्ये तयार करण्यात आलेले गामीण रस्ते पावसाळ्यात तडे जात असल्यामुळे नदी काठावर रस्त्यांचा प्रश्न दर वर्षी उद्भवत असतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करुन काळ्या मातीमध्ये टीकाव धरतील असे रस्ते तयार करण्याची गरज असतांना मात्र सर्वच रस्त्यांना सारखेच निकष लावून रस्ते तयार करण्यात येत असल्यामुळे धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यात रस्त्यांची दुरावस्था होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याबाबतीत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०३-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २.३६.००० कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्याच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते.

धुळे जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ४८५४.८० कि.मी. आहे. रस्ते व पूल दुरुस्ती व परीक्षण या कार्यक्रमाअंतर्गत सन २०१३-१४ ते २०१४-१५ मध्ये रु. ५७७.०१ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. तर तेराव्या वित्त आयोगाअंतर्गत सन २०१३-१४ मध्ये धुळे जिल्हा परिषदेस रु. १५४.२६ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून सन २०१४-१५ अंतर्गत रु. १६४.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. सन २०१३-१४ मध्ये पुरहानी कार्यक्रमाअंतर्गत रु. ६७५.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

नंदूरबार जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ५२८०.४६ कि.मी. आहे. रस्ते व पूल दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमाअंतर्गत सन २०१३-१४ ते २०१४-१५ मध्ये रु. ६४३.०४ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. तर तेराव्या वित्त आयोगाअंतर्गत सन २०१३-१४ मध्ये नंदूरबार जिल्हा परिषदेस रु. १६७.८१ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून सन २०१४-१५ अंतर्गत रु. १७८.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. सन २०१३-१४ मध्ये पुरहानी कार्यक्रमाअंतर्गत रु. ६२६.५० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

जिल्हा परिषदांना विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिनतेने प्राथम्य क्रमानुसार रस्त्यांची कामे करण्याचे जिल्हा परिषदांचे नियोजन आहे.

---

**खोपोली शहरालगत असणा-या साजगाव-अडोशी औद्‌योगिक वसाहतीमधील जड वाहन वाहतुकीमुळे रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(२३) ८२७ (२२-१२-२०१४). श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली शहरालगत असणा-या साजगाव-अडोशी औद्‌योगिक वसाहतीमधील जड वाहन वाहतुकीमुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०४-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३)

अतिअवजड वाहतुकीमुळे व अतिवृष्टीमुळे सदर रस्त्यावर काही ठिकाणी खड्डे पडले होते. सदर खराब झालेला भाग दुरुस्त करुन घेण्यात आला आहे. सद्य स्थितीत रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाली भुतिवली (ता.कर्जत, जि.रायगड)धरणाचे काम निधी अभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२४) ८२९ (२२-१२-२०१४). श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील पाली भुतिवली धरणाचे काम निधी अभावी रखडले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कालव्यासाठी जमिन भूसंपादन कार्यवाही केली आहे काय,

(३) असल्यास, सदर धरणाला निधी न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, तसेच निधी देऊन धरणाचे काम तातडीने करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) असल्यास, धरणामध्ये पाणीसाठा असून जनतेची पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीसाठी होणारी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०३-२०१५) :** (१) नाही.

पाली - भुतिवली धरणाचे काम बहुतांशी पुर्ण झाले आहे.

(२) कालव्यासाठी भूसंपादन कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३), (४), (५) व (६) प्रकल्पाच्या कामासाठी सन २००८-०९ पासून सन २०१३-१४ पर्यंत निधी सलगपणे उपलब्ध होत असून निधी उपलब्धतेनुसार पुढील २ वर्षात धरणाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच मागणीच्या प्रमाणात पिण्यासाठी पाणी सोडण्यात येत असून कालव्याचे काम पूर्ण झाल्यानंतर शेतीसाठी पाणी सोडण्याचे नियोजन आहे.

---

**कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील राष्ट्रीय महामार्ग-४ वरील मॅकडोनाल्ड जवळ पार्किंगमुळे होणारे अपघात**

**(२५) ८६४ (२२-१२-२०१४). श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील राष्ट्रीय महामार्ग-४ वरील मॅकडोनाल्ड जवळ बेकायदेशीररित्या पार्किंग करणाऱ्या वाहनांमुळे होणाऱ्या अपघातात मोठ्या प्रमाणात होणारी जिवीत व वित्त हानी टाळण्यासाठी उक्त ठिकाणी प्रवाशांसाठी बस थांबा बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी अनधिकृतपणे वाहने उभी करुन प्रवाशांचे जीव धोक्यात घालणाऱ्या वाहनचालकांवर कोणती कारवाई केली तसेच नविन बस थांबा निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०४-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि या ठिकाणी नवीन बस थांबा बांधण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे हातीव (ता.संगमनेर, जि.रत्नागिरी) येथील अंगणवाडीतील इमारतीला महावितरणाने वीज मीटर नसताना वीज देयके दिल्याबाबत**

**(२६) ९१८ (१५-०१-२०१५). श्री. संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हातीव (ता.संगमनेर, जि.रत्नागिरी) येथील अंगणवाडीतील इमारतीला महावितरणाचा वीज मीटर नसताना महावितरणाने १ हजार ७० रुपयाचे वीजदेयके दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी काय आढळून आले व तदनुसार विद्युत मीटर नसताना वीज देयके पाठविणा-या महावितरण अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) चौकशीमध्ये वीज पुरवठा न करता वीज देयक देणा-या शाखा अधिकारी व कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कार्यवाही चालू आहे. तसेच सदर ग्राहकाला दिलेले चुकीचे बील रद्द करण्याची कार्यवाही केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे शिर्ला नेमाने (ता.खामगांव,जि.बुलढाणा) येथील निळ्या पट्याखाली येणाऱ्या पुरग्रस्त घरांचे पुनर्वसन करणेबाबत**

**(२७) ९२४ (२३-१२-२०१४). श्री. आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शिला नेमाने (ता. खामगांव जि.बुलढाणा) येथील नदी पात्रातील पाणी हे सन २००५-२००६ च्या अतिवृष्टीमुळे गावातील लोकांच्या घरात शिरुन त्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन राज्यमंत्री महोदय डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी पूरग्रस्त गावांची पाहणी करुन जिल्हाधिका-यांची तातडीने बैठक बोलावून पूरग्रस्त भागाचे लवकरच पुनर्वसन करु असे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू गावाचे पुनर्वसन न झाल्यामुळे या गावातील महिला व पुरुष दिनांक २४ जानेवारी, २०११ रोजी खामगांव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले होते, त्यावेळेस तत्कालीन उप विभागीय अधिकारी यांनी सदर पुरग्रस्त भागाचे तात्काळ पुनर्वसन करुन देण्यात येईल असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिला नेमाने या गावांतील पुरग्रस्त भागाचे तात्काळ पुर्नवसन करण्याबाबत पुढील कारवाई करणेसंदर्भात संबंधितांना आदेश देणार आहेत काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०४-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
त्यावेळी उपविभागीय अधिकारी खामगांव यांनी तोंडी आश्वासन दिले होते.
(४) राज्यातील पुरामुळे बाधीत झालेल्या गावांचे पुनर्वसनाचे सर्वकष धोरण ठरविण्याचे काम शासन स्तरावरुन प्रगतीपथावर आहे.

---

**खामगांव (जि.बुलडाणा) येथे बसविण्यात येणा-या निकृष्ट दर्जाचे**
**डी.पी. ट्रान्सफार्मर व मिटर बाबत**

**(२८) ९२५ (२२-१२-२०१४). श्री. आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलडाणा) येथे विज वितरण कंपनीद्वारे सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ मध्ये किती डी.पी. व ट्रान्सफार्मर बसविण्यात आले,

(२) असल्यास, त्यापैकी जळालेल्या डि.पी. व ट्रान्सफार्मरची संख्या किती,

(३) असल्यास, डी.पी., ट्रान्सफार्मर व शेतक-यांना वितरीत करण्यात येणारे मिटर कोणत्या कंपनीचे आहेत,

(४) असल्यास, निकृष्ट दर्जाच्या डि.पी, ट्रान्सफार्मर व नविन मिटर वितरीत करणा-या संबंधित कंपन्यांना काळया यादीत टाकणे तसेच फसवणूकीबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) खामगांव जि.बुलडाणा येथे वर्ष २०१२-१३ मध्ये ११७ ट्रान्सफार्मर (डी.पी) व वर्ष २०१३-१४ मध्ये ५१ ट्रान्सफार्मर (डी.पी) बसविण्यात आले.

(२) यापैकी वर्ष २०१२-१३ मध्ये ९ व २०१३-१४ मध्ये ७ ट्रान्सफार्मर (डी.पी.) नादुरुस्त झाले. सदर ट्रान्सफार्मर (डि.पी.) हमी कालावधीमध्ये असल्यामुळे नियमानुसार संबंधित कंपनीकडून मोफत दुरुस्त करुन घेण्यात आलेले आहेत.

(३) ट्रान्सफार्मर (डी.पी.) हे विजय इलेक्ट्रीकल्स, हैद्राबाद व कॉटसन प्रायव्हेट लि. आग्रा या कंपनीचे आहेत. शेतक-यांना कृषीपंपाकरीता बसविण्यात आलेले मिटर जीनस पॉवर इन्फ्रास्ट्रक्चर लि.हरिद्वार, एल.अॅण्ड टी. लि. मैसूर व शेनजेन कैफा टेक्नालॉली लि. सेनझेन कंपनीचे आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही. हमी कालावधीमधील नादुरुस्त ट्रॉन्सफार्मर (डी.पी.) व मीटर, संबंधित कंपनीकडून दुरुस्त करुन घेण्यात आले असल्याने कारवाई करणे आवश्यक नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे दिवठाणा, (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील जमिन**
**बाजारभावाप्रमाणे खरेदी करण्याबाबत**

**(२९) ९४० (२२-१२-२०१४). श्री. आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव, तालुक्यातील (जि.बुलढाणा) निमकवळा शिवारात ज्ञानगंगा नदीवर निम्न ज्ञानगंगा लघु प्रकल्प नावाचे छोटे धरण बांधण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणासाठी निमकवळा, काळेगांव, दिवठाणा व वर्णा येथील शेतक-यांची

जमिन संपादित करण्यात आली असून आतापर्यंत प्रकल्पासाठी बाधित क्षेत्रापैकी १२७ हेक्टर जमिन पाटबंधारे विभागाने सरळ खरेदी करुन संपादित केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या ४ गावांची शेतजमीन बाजारभावाप्रमाणे (सुमारे १० लाख रुपये किंमतीने) सरळ खरेदी व्यवहाराने संपादित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, दिवठाणा येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे भू-संपादन बाजारभावाप्रमाणे सरळ खरेदी करण्याबाबत शासनाने मंजुरी दिलेली असतांनाही अद्यापपर्यंत या गांवातील शेतजमिन संपदित केलेली नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या गांवातील शेतजमिनीचे संपादन जुन्या भू-संपादन कायद्याप्रमाणे संपादित करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे सादर केल्यामुळे या गांवातील भू-संपादनाची प्रक्रिया बंद असल्यामुळे प्रकल्पाचे कामही बंद आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, मौजे दिवठाणा या गांवातील शेतजमिन बाजारभावाप्रमाणे सरळ खरेदी करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत शासन कोणती ठोस उपाय योजना करणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०४-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे. मौज काळेगांव निमकवळा व रोहणा येथील एकूण १२७.७६ हे जमीन सरळ खरेदी केलेली आहे.

(३) खरे आहे. जमिनीच्या सरळ खरेदीच्या सरासरी दर रु.९.६२ लाख एवढा आहे.

(४) हे खरे आहे.

दिवठाणा येथील शेतक-यांनी शेत जमीनीचे भूसंपादन नवीन कायद्यानुसार मोबदला देऊन करण्याबाबत अर्ज दिल्यामुळे व नविन भूसंपादन कायद्याप्रमाणे मोबदला देण्याचे अंतिम शासन राजपत्र दिनांक १३.०८.२०१४ रोजी प्राप्त झाल्यामुळे सरळ खरेदीने जमिन घेता आलेली नाही.

(५) दिवठाणा गावची जमिन बुडीत क्षेत्राच्या शेवटच्या भागात आहे. सद्यःस्थितीत सदर जमिनीची आवश्यकता नाही. भविष्यात काही शेतक-यांनी सरळ खरेदी पध्दतीने जमिन देण्यास नकार दिल्यास प्रकल्पाच्या कामात अडथळा येऊ नये व भूसंपादन अधिनियमांतर्गत करता यावे या साठी भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना सादर करण्यात आलेला आहे. सद्यःस्थितीत सदर प्रस्तावाची कलम ९ ची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यतेअभावी काम बंद करण्यात आले होते. तथापि महाराष्ट्र शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१४/६९ प्र.क्र.९६/२०१४ मध्यम प्रकल्प, दिनांक ०७.०८.२०१४ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत उपलब्ध असलेला निधी खर्च करण्याची परवानगी दिली असल्यामुळे प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

(६) दिवठाणा येथील भूसंपादन प्रस्तावाची कलम-६ प्रसिध्द करण्यात आली असून कलम-९ ची कार्यवाही जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या मार्फत प्रगतीपथावर आहे.

---

**मोहोळ तालुक्यात गाव तंटामुक्ती अभियान यशस्वीरित्या राबविण्याबाबत**

**(३०) ९४२ (२२-१२-२०१४). श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शांतता नांदावी म्हणून शासनाने तंटामुक्ती अभियान सुरु केले असतांना मोहोळ तालुक्यात गाव तंटामुक्ती अभियान योग्यप्रकारे न राबविता पोलीसांमार्फत गुन्हे दाखल करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोहोळ तालुक्यात गाव तंटामुक्ती अभियान यशस्वीरित्या राबविण्यात यावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१५) :** (१) हे खरे नाही.

फिर्यादीने दिलेल्या फिर्यादी वरुन गुन्ह्याचे स्वरुप व कारण पाहून गुन्हे दाखल करण्यात येतात.

(२) मोहोळ पोलीस ठाणेअंतर्गत सन २००७ ते आजतागायत एकूण ४८ गावे तंटामुक्त करण्यात आली आहेत. सदरची गावे तंटामुक्त करणेकरिता गावभेटी दरम्यान मार्गदर्शन करणेकरिता उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर, पोलीस निरीक्षक मोहोळ पोलीस ठाणे तसेच त्यांचेकडील दुय्यम अधिकारी बीट अंमलदार यांना वेळोवळी मार्गदर्शन करण्यात येते. तसेच पोलीस कर्मचारी यांचे पथकामार्फत चित्ररथातून दौरे करुन "सातासमुद्रापलीकडे तंटामुक्ती" या नाट्यप्रयोगातून प्रबोधन, प्रचार व प्रसिध्दीद्वारे जास्तीत जास्त गावे तंटामुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर विद्यापिठातील शिक्षकेत्तर पदाच्या भरती प्रक्रिया व निवड प्रक्रियेच्या संदर्भात**

**(३१) ९५३ (२२-१२-२०१४). श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. बबनराव शिंदे (माढा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर विद्यापिठातील शिक्षकेत्तर पदाच्या भरती प्रक्रिया व निवड प्रक्रियेच्या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार चौकशी करण्यासाठी शासनाने दिनांक २८ मे, २०१४ रोजी दुसरी चार सदस्यीय समिती नेमून एक महिन्यात अहवाल सादर करण्याबाबतचे आदेश दिले होते परंतु सदरचे आदेश देऊन पाच महिन्यांचा कालावधी लोटूनही सदर समितीकडून अहवाल प्राप्त झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच प्रमाण संहिता, १९८४ ही नियमावली दिनांक २० मे, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार सोलापूर विद्यापिठातील कर्मचारी निवड योग्य किंवा अयोग्य याबाबत उमेदवार निहाय स्पष्ट शिफारशी कराव्यात असे आदेश समितीला दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०४-२०१५) :** (१) होय.
(२) प्रमाणसंहिता नियम, १९८४, भरती प्रक्रिया व निवड प्रक्रियेच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, नियम, विनियम, इ.मधील तरतुदी विचारात घेऊन विद्यापीठातील कर्मचारी निवड योग्य किंवा अयोग्य याबाबत अमेदवार निहाय स्पष्ट शिफारशी कराव्यात, असे निदेश समितीला देण्यात आलेले आहेत.
(३), (४) व (५) चौकशी समितीची कार्यवाही सुरु असून अहवाल प्राप्त करण्यासाठी समितीकडे पाठपुरवा सुरु आहे.

---

**मुंबईतील अंधेरी (पूर्व) मरोळ येथे गरीब रुग्णासाठी कर्करोग रुग्णालयाचा लाभ मिळण्याकरिता सदरहू रुग्णालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याबाबत**

**(३२) ९६९ (२३-१२-२०१४). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, अंधेरी पूर्व येथील मरोळ येथे गरीब रुग्णासाठी कर्करोग रुग्णालयासाठी राखीव भूखंडावर महानगरपालिकेने सन १९९९ मध्ये सुरुवात करुन सुमारे ३५ कोटी रुपये खर्च करण्यात येवून सध्या रुग्णालयाचे बांधकाम थांबविण्यात आल्यामुळे गरीबांचे कर्करोग रुग्णालयाचे स्वप्नचे राहिल्याने त्यांच्यात तीव्र नाराजी पसरलेली असल्याचे माहे सप्टेंबर २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गरीब रुग्णांना या कर्करोग रुग्णालयाचा लाभ मिळण्याकरिता सदरहू रुग्णालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१५) :**(१) व (२) मुंबईतील मरोळ अंधेरी (पूर्व) येथील भुखंड हा रुग्णालय या सार्वजनिक उद्दीष्टांकरीता आरक्षित आहे. सदर रुग्णालयाकरिता आरक्षित असलेल्या भूभागावर महानगरपालिकेने कर्करोग रुग्णालय म्हणून विकसित करण्यासाठी कंत्राटदार मार्फत महानगरपालिकेच्या निधीतून रुग्णालयाची इमारत व त्या अनुषंगाने लागण-या इतर इमारती म्हणजेच डॉक्टरांकरिता निवासस्थाने, परिचारिकांकरिता वसतिगृह, कर्मचारी निवासस्थाने इत्यादींचे बांधकाम करण्याकरिता महानगरपालिकेने मे.गॅमन इंडिया लि. व मे. युनिटी कन्स्ट्रक्शन या दोन कंत्राटदारांची नेमणूक करुन त्यांना ३०.०९.१९९८ रोजी कार्यादेश

देण्यात आले. सदर दोन कंत्राटदारांनी सदर कामासाठी एकूण अंदाजे रुपये ३५.०० कोटी किंमतीचे २६९९० चौ.मी. बांधकाम दिनांक ३०.०४.२००१ पर्यंत केले. तथापि पुढे आर्थिक चणचणीमुळे सदर रुग्णालयावर अधिक दायित्व न घेता अपूर्ण अवस्थेत असलेल्या रुग्णालयाचे व त्या अनुषंगाने लागणा-या इतर इमारतींचे उर्वरित बांधकामे खासगी संस्थेद्वारे पूर्ण करुन त्यात अत्याधुनिक सेवांनी युक्त रुगणालय बांधून चालविण्याबाबतचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला. त्या अनुषंगाने खाजगी संस्था व उद्योजकांमार्फत प्रकल्प पूर्ण करण्याकरिता व पुढे चालविण्यासाठी सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर सन २००२-०३ च्या सुमारास निविदा मागविण्यात आली. सदर निविदेत रुग्णालयात आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गासाठी, आजी व माजी महानगरपालिका कर्मचारी व नगरसेवक ह्या सर्वासाठी मिळून एकूण २० टक्के खाटा राखीव ठेवण्याबाबतची तरतूद करण्यात आली होती. त्या अनुषंगाने महापालिका प्रशासनाने मे.सेव्हन हिल हेल्थकेअर प्रा.लि. ह्या खाजगी संस्थेची निवड केली. सदर संस्थेद्वारे अत्याधुनिक सेवांनी युक्त रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण करुन नागरीकांच्या सेवेसाठी वर्ष २०१० च्या सुमारास उपलब्ध पूर्ण करुन सदर रुग्णालय कार्यरत करण्यात आले सदर रुग्णालयात आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गासाठी, आजी व माजी महानगरपालिका कर्मचारी व नगरसेवक या सर्वांसाठी मिळून एकूण २० टक्के खाटा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका सुधार समितीच्या दिनांक २९.०१.२००४ चा ठराव व महानगरपालिकेच्या दिनांक १२.२.२००४ च्या ठरावान्वये मान्यता मिळालेल्या अटी व शर्तीनुसार सेव्हन हिल्स रुग्णालयाच्या व्यवस्थापन करतांना रुग्णालयाच्या सर्व विभागांच्या एकूण खाटांपैकी २० टक्के खाटा महानगरपालिकेच्या रुग्णांकरिता राखीव ठेवण्याची यंत्रणा व त्याबाबतच्या धोरणांची पारदर्शक अंमलबजावणी करण्याकरिता दिनांक १३.१२.२०१३ रोजी सेव्हन हिल्स प्रा.लि. व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात आला.

अंधेरी मरोळ मुंबई येथील सेव्हन हिल्स हे १५०० खाटांचे रुग्णालय आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेशी झालेल्या सामंजस्य (एम.ओ.यु.) यापैकी २० टक्के खाटा महानगरपालिका रुग्णांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. सध्या या रुगणालयात ३२२ रुग्णशय्या कार्यरत आहेत. त्यापैकी ५५ खाटा अतिदक्षता विभागात आहेत. या खाटांपैकी एकूण ६५ खाटा (त्यापैकी ११ खाटा अतिदक्षता रुग्णशय्या) महापालिका रुग्णांसाठी राखीव आहेत. सदर रुग्णालयात उपलब्ध असलेल्या सेवा सुविधांमध्ये सी.टी.स्कॅन / एम.आर.आय. स्कॅन / कर्करोग चिकीत्सा सेवा / हृदयरोग चिकीत्सा डायलेसिस इ. चा समावेश आहे. तसेच राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनांतर्गत रुगणांना दाखल करुन उपचार करण्यात येतात. सामंजस्य करारातील अटी व शर्तीनुसार सदर रुग्णालयात महापालिकेच्या रुग्णांमध्ये पिवळे नारिंगी शिधापत्रिकाधारक आजी व माजी महापालिका कर्मचारी व त्यांचे अवलंबित, महापालिकेच्या रुग्णालयातून पाठविलेले सर्व रुग्ण, महापालिका सदस्य व त्यांचे अवलंबित यांचा समावेश होतो. अशा रुग्णांना दाखल करुन त्यांच्यावर उपचार करणे बंधनकारक आहे.

सामंजस्य करारातील अटी व शर्तीचे पूर्णतः पालन व्हावे यावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेकडून विशेष कार्य अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर

विशेष कार्य अधिकारी दररोज रुग्णालयात हजर असतात व महापालिकेचे रुग्ण म्हणून सेव्हन हिल्स रुग्णालयात उपचारासाठी येणा-या रुग्णांच्या समस्यांचे निराकरण करतात. सदर विशेष कार्य अधिकारी यांच्यावर वैद्यकीय अधीक्षक/ प्रमुख वैद्यकीय अधिकारी व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) यांचे पर्यावेक्षण असते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विविध सहकारी कामांसाठी लागणा-या दस्त ऐवजांचे नोटरीबाबत**

**(३३) १०२१ (२२-१२-२०१४). श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध सहकारी कामांसाठी लागणा-या दस्त ऐवजांचे नोटरीकडून अथवा राजपत्रित अधिका-याकडून साक्षांकन करुन घेण्याऐवजी अर्जदाराने अशा दस्ताऐवजांचे स्वसाक्षांकन करण्याच्या पध्दतीस प्रोत्साहन देण्याची केंद्र शासनाने राज्य शासनाला सूचना केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या शिफारशीनुसार राज्य शासनाकडून उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१५) :** (१) व (२) शासकीय सोयी/ सुविधांकरिता शपथ पत्राऐवजी स्व घोषणापत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीऐवजी स्वसाक्षांकित प्रती स्वीकारण्याबाबत शासन निर्णय क्रमांक प्रसुधा १६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ, दिनांक ०९ मार्च, २०१५ निर्गमित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ममदापुर (ता. येवला, जि.नाशिक) येथील मेळाच्या बंधा-याचा प्रस्ताव सचिव समितीच्या मान्यतेसाठी प्रलंबित असल्याबाबत**

**(३४) १०२६ (१५-०१-२०१५). श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला तालुक्यातील (जि.नाशिक) ममदापुर येथील मेळाच्या बंधा-याचा प्रस्ताव सचिव समितीच्या मान्यतेसाठी प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०३-२०१५) :** (१) व (२) नाही.

मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक ०९/१२/२०१४ च्या पत्रान्वये अहवाल शासनास सादर झाले आहेत. त्यावर शासनाचे दिनांक १७/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या शे-यांची पूर्तता विभागीय स्तरावर प्रगती पथावर आहे. वन क्षेत्राची संयुक्त मोजणी झालेली असून अहवाल वन विभागाकडून अद्याप अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याला नागरीकांना पिण्यासाठी आरक्षित केलेलं पाणी नगर जिल्ह्यातील रब्बीच्या सिंचनासाठी सोडण्यात येणार असल्याबाबत**

**(३५) १०२७ (१५-०१-२०१५). श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगामी सिंहस्थ कुंभमेळयाला नागरीकांना पिण्यासाठी आरक्षित केलेले पाणी नगर जिल्ह्यातील रब्बीच्या सिंचनासाठी सोडण्यात येणार असल्याचे दि. ९ नोव्हेंबर, २०१४ रोजी उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आगामी सिंहस्थ कुंभमेळा काळातील पावसाळयात पाऊस न झाल्यास सिंहस्थमध्ये येणा-या करोडो नागरीकाच्या पिण्याच्या पाण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०४-२०१५) :** (१) नाशिक महानगरपालिकेसाठी आरक्षित केलेले पाणी सिंचनासाठी सोडण्यात येणार नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अपंग व्यक्तींना शासकीय कार्यालय, सार्वजनिक ठिकाणी सहज जाता यावे याकरिता रॅम्पची सुविधा उपलब्ध करण्याबाबत**

**(३६) १०९४ (२२-१२-२०१४). श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंग व्यक्तीला कुठल्याही शासकीय कार्यालय, सार्वजनिक ठिकाणी सहज जाता यावे याकरिता रॅम्पची सुविधा उपलब्ध करण्याचा अध्यादेश काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असे असतानाही कोल्हापूर शहरातील शासकीय कार्यालयात, सार्वजनिक ठिकाणी, शाळा महाविद्यालयांत अशा त-हेचे रॅम्प अद्यापही बसविण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या अध्यादेशाची अंमलबजावणी करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (११-०५-२०१५) :** (१) दिनांक २ डिसेंबर, २००३ च्या शासन परिपत्रकान्वये सार्वजनिक ठिकाणे व इमारतींचे परिक्षण (Access Audit) करण्याबाबत सर्व शासकीय विभाग / कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) अंशतः खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांचेमार्फत महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती आराखडा - २००९ च्या अंमलबजावणी अंतर्गत मार्च, २००९ नंतर बांधण्यात आलेल्या १७ इमारतींना रॅम्प उपलब्ध करुन देणेत आलेले आहेत. तथापि, सन २००९ पूर्वी बांधण्यात आलेल्या २० इमारतींना रॅम्पची सुविधा करणे अद्याप बाकी आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांनी सन २००९ पूर्वी बांधलेल्या इमारतींच्या रॅम्पच्या बांधकामासाठी अनुदान उपलब्ध झाल्यास उर्वरित रॅम्प बसविणेबाबत कार्यवाही अग्रक्रमाने हाती घेण्यात येईल. तसेच कोल्हापूर महानगरपालिकेने ज्या ठिकाणी रॅम्पची सुविधा उपलब्ध नाही, त्याठिकाणी रॅम्प बसविणेबाबतची कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने शासन परिपत्रक दिनांक १० मे, २०१३ अन्वये नव्याने बांधण्यात येणा-या शासकीय इमारतींचे अंतिम देयक अदा करण्यापूर्वी अपंगांकरीता आवश्यक सुविधा करण्यात आलेल्या आहेत किंवा कसे, याची खातरजमा करुनच देयक अदा करण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

---

**आटपाडी, खानापूर, तासगांव (जि.सांगली) तालुक्यामध्ये वीजेचे कनेक्शन मिळण्याबाबत**

**(३७) ११०३ (२१-१२-२०१४). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी, खानापूर, तासगांव (जि.सांगली) तालुक्यामध्ये वीजेचे कनेक्शन मिळण्यासाठी अनेक शेतक-यांनी वीज वितरण कंपनीकडे रक्कम भरून देखील अद्यापही वीजेची कनेक्शन देण्यात आली नसल्याने अनेक शेतकरी वीजे पासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) होय.

(२) शेतीपंपाची कनेक्शन पायाभूत आराखडा - २ अंतर्गत जेष्ठता यादीनुसार करून घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सदरहू कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कंत्राटदाराकडे पाठपुरावा करून कामे प्राधान्याने पुर्ण करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाळवणी (ता.खानापूर, जि.सांगली) येथे वीजेचे सबस्टेशन मंजूर करण्याबाबत**

**(३८) ११०४ (२२-१२-२०१४). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाळवणी (ता.खानापूर, जि.सांगली) येथे वीजेचे सबस्टेशन मंजूर करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी व स्थानिक नागरिकांनी माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये तसेच त्या अगोदरही वीजमंडळाच्या स्थानिक अधिका-यांकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु ठिकाणी अद्यापही सब स्टोशन मंजूर करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त सबस्टेशन मंजूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१४) :** (१) होय.

(२) व (३) भाळवणी उपकेंद्राच्या प्रस्तावाची तांत्रिक तपासणी प्रगतीपथावर आहे. सदर प्रस्ताव तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्यास व आर्थिकबाबींची पूर्तता झाल्यास भाळवणी उपकेंद्राचा समावेश पायाभूत आराखडा-२ पुर्नःनिर्धारीत कामांमध्ये किंवा दिनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजनेमध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

---

**नागपूर येथे एस.एस.डी.एल. विद्युत कंपनी द्वारे घराचे जुने मीटर बदलवून नवीन लावण्यात येत असल्याबाबत**

**(३९) १११७ (१५-०१-२०१५). श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे एस.एस.डी.एल. विद्युत कंपनी द्वारे गांधीबाग सिव्हील लाईन व महाल या परिसरातील ग्राहकांच्या घराचे जुने मीटर बदलवून नवीन लावण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांना पूर्वी येणा-या वीज देयकाच्या तीन ते चार पट देयके जास्त दराने येत आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, मध्य नागपूर परिसरातील धोकादायक विद्युत वाहिन्या भुमीगत करण्यासाठी अनेकदा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास. विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) विद्युत वाहिन्या अरूंद बोळी व अडचणीच्या रस्त्यावर असल्यामुळे विद्युत वाहिन्यां भूमिगत ऐवजी सुरक्षेच्या दृष्टीने ऐबी केबलने (एअर बंच केबल) बदलविण्यात आल्या.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे विभागात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच सर्व खाजगी शाळांना वीजदर व्यावसायिक दराने आकारण्यात येत असल्याबाबत**

**(४०) ११८७ (२२-१२-२०१४). श्री. बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विभागात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच सर्व खाजगी शाळांना व्यावसायिक दराने वीज दर आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शाळांना भरमसाठ वीज देयक येत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वीज देयक अदा करण्याकरीता कोणत्याही प्रकारचे अनुदान शासनाकडून देण्यात येत नसल्याने ५० टक्क्यांपेक्षा अधिक शाळांनी वीज बिल न भरल्यामुळे वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी निदेशक, गट निदेशक यांना रिक्त पदावर कायमस्वरुपी करण्याचा निर्णय प्रलंबित असल्याबाबत**

**(४१) ११८९ (२२-१२-२०१४). श्री. बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी निदेशक, गट निदेशक यांना रिक्त पदावर कायमस्वरुपी करण्याचा निर्णय अद्यापही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कंत्राटी निदेशक म्हणून औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी याबाबत अनेकदा आंदोलने केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यन्त राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी निदेशक यांना कायमस्वरूपी रिक्त पदावर कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०३-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून कायदेशीर बाबी तपासण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या औद्योगिक सहकारी संस्थाच्या नविन प्रकल्पांना निधी न मिळाल्याबाबत**

**(४२) ११९५ (२२-१२-२०११). श्री. बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या औद्योगिक सहकारी संस्थाच्या नविन प्रकल्पांना अद्याप पहिला हप्ता वाटप करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ३ वर्षापासून पहिला हप्ता वाटप होण्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०३-२०१५) :** (१) होय.

(२) सध्या आस्तिवात मंजूर प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर नविन प्रकल्पांना मंजुरी देण्याबाबत विचार करण्यात येईल. हि बाब पहाता आयुक्तालय स्तरावर प्रलंबित असलेले प्रस्ताव न पाठविण्याबाबत शासन पत्र दिनांक २०/९/२०१२ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

---

**मुंबईत वांद्रे (पश्चिम) येथे बायोगॅस प्रकल्प सुरु करण्याबाबत**

**(४३) १२०८ (२३-१२-२०१४). ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वांद्रे पश्चिम रिक्लेमेशन येथील मनपाच्या घनकचरा विभागात घनकच-यावर प्रक्रिया करुन ५ मेट्रिक टनाचा बायोगॅस प्रकल्प सुरु करण्यासाठी मनपा आयुक्त यांना स्थानिक सामाजिक संस्थेने सन २००४ पासून अनेक वेळा निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरात घनकचरा डंपिंगसाठी निर्माण झालेला प्रश्न यावर मात करण्यासाठी व पर्यावरणाच्या हितासाठी हा प्रकल्प करणे आवश्यक असताना न करण्यामागची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच बायोगॅस सारखा पर्यावरण हिताचा प्रकल्प या ठिकाणी कार्यान्वित करण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१५) :** (१) बांद्रा रिक्लमेशन एरिया व्हालंटियर्स ऑर्गनायझेशन (BRAVO) या स्थानिक स्वयंसेवी संस्थेकडून बांद्रा रिक्लेमेशन सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या परिसरात ५ टन क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प सुरु करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (शहर) यांच्याकडे दिनांक २६.०४.२०११ रोजी प्रस्ताव आला होता.
(२) सदर संस्थेने या प्रकल्पासाठी वांद्रे रेक्लेमेशन येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या परिसरातील जागा मागितली होती. परंतु सदर जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनिःसारण प्रकल्पासाठी आवश्यक असल्याने मलनिःसारण विभागने प्रस्तावित बायोगॅस प्रकल्पास जागा उपलब्ध केली नाही.
(३) व (४) बृहन्मुंबई महानरगपालिकेतर्फे विविध ठिकाणी बायोमिथेनेशन प्रकल्पासाठी दिनांक ३०.१२.२०१४ रोजी जागतिक स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मागविण्यात आल्या आहेत.

---

**राज्यातील विशेषत: शहरात वाहतूकीच्या नियमांचे पालन होत नसल्याबाबत**

**(४४) १२४७ (२२-१२-२०१४). श्री. विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: शहरात वाहतूकीच्या नियमांचे पालन होत नाही, रस्त्यावरील सिग्नल बंद असणे व झेब्रा कॉसिंगचे पट्टे नसल्याने गाड्या सिग्नल तोडून जातात पोलीस त्यांच्यावर कारवाई करीत नाही त्यामुळे रस्ता ओलांडतांना सर्वसामान्य नागरिकांना कसरत करावी लागते व त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढते यासाठी राज्य शासनाला मा.उच्च न्यायालयाने वाहतूक पोलीस शिपायाला वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार द्यावेत असा आदेश दोन वर्षापूर्वी दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन वर्षाचा कालावधी उलटून गेला तरी त्यानुंषगाने कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत वा शासन स्तरावरील कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०४-२०१५) :** (१) तडजोड शुल्क स्विकारुन गुन्हा निकाली काढण्याचे अधिकार पोलीस शिपायांना देयाबाबत मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.१८/२०१० मध्ये दिनांक २८.१०.२०१४ रोजी आदेश दिले आहेत.
(२) मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात पोलीस नाईक व पोलीस शिपाई यांना व ठाणे, पुणे, नवी मुंबई, नागपूर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात पोलीस नाईक यांना जागेवर तडजोड शुल्क स्विकारुन गुन्हा निकाली काढण्याचे अधिकार देण्याबाबतची अधिसूचना दिनांक २४ मार्च, २०१५ राजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

---

## मुंबई येथे बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाल्याबाबत

**(४५) १२५५ (२३-१२-२०१४). श्री. बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाला आहे आणि ते मुंबईतील जनतेच्या जीवाशी खेळ करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस डॉक्टराविरुध्द कारवाई करण्यासाठी पुर्नविलोकन समितीची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील ठिकठिकाणच्या दवाखान्यामध्ये जाऊन डॉक्टरांची नोंदणी तपासली आहे काय याची खातरजमा महानगरपालिका अधिकाऱ्यांनी केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१५) :** (१) मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अंतर्गत वैद्यकीय आरोग्य अधिका-यांनी माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार ९५ संशयित बोगस डॉक्टर्स आढळून आले आहेत.

(२) सदर बोगस डॉक्टरांविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यातर्फे पुनर्विलोकन समितीची स्थापना करण्यात आली आहे.

(३) होय.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाने जाहीर केलेल्या क्रीडा धोरणाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(४६) १२८२ (२२-१२-२०१४). श्री. अनिल कदम (निफाड), श्री. प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी), श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. संजय सावकारे (भुसावळ), श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने गत चार वर्षापासून जाहिर केलेल्या क्रिडा धोरणानुसार जिल्हास्तरीय आंतर शालेय स्पर्धांच्या आयोजनासाठी प्रत्येक खेळा मागे रु. २५०० ऐवजी रु.१५ हजार रुपये तर तालुका स्तरावरील स्पर्धांच्या प्रत्येक खेळासाठी रु.५०० ऐवजी १०,००० रुपये देण्याची शिफारस केली असतानाही अद्यापही त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे २५०० रुपयातच पंचांचे मानधन, स्पर्धेची तयारी, क्रीडा सामुग्री व इतर बाबी पुर्ण करणे दुरापास्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने सदर शिफारशींची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०२-२०१५) :** (१), (२), (३) व (४) शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनासंदर्भातील प्रचलित अनुदान दरात वाढ करण्याबाबतचा शासन निर्णय दि.२४.१२.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

---

**को.प.बंधारा सोनवडी-नानविज (ता.दौंड, जि.पुणे) येथील भुसंपादन २-३ रक्कम मंजूर होणेबाबत**

**(४७) १२९४ (२२-१२-२०१४). श्री. राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर पध्दती बंधारा सोनवडी-नानविज (ता.दौंड, जि.पुणे) या बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रामध्ये गेलेल्या जमिनीचे भुसंपादन कार्यवाही करणेसाठी व या भुसंपादनाची २/३ रक्कम प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देण्यासाठी आर्थिक निधी मंजूर होणेबाबतचा प्रस्ताव मा.अधिक्षक अभियंता पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांना जा.क्र. पुपामं/अर्थ-२/७७४६ सन २००८ दिनांक १२ सप्टेंबर, २००८ अन्वये मा.कार्यकारी अभियंता महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे वतीने मान्यता देण्यात आली आहे काय, तसेच या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) दौंड तालुक्यातील (जि.पुणे) पेडगांव, देऊळगावराजे, खारेवडी, सोनवडी, कानगांवस, हातवळण, पारगांव या को.प.बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रामध्ये जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या बुडीत जमिनी संपादित करुन नुकसान भरपाई देणेबाबतच्या व या बुडीत जमिनी संपादित करणेबाबतच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०३-२०१५) :** (१) होय.

(२) महामंडळाने २/३ रक्कम रु. १५,७१,९३९/- दि. २१.१०.२०१० रोजी विशेष भूसंपादन अधिकारी क्रं.२, पुणे यांना उपलब्ध करुन दिले आहेत. भूसंपादन प्रस्ताव कलम ४ ची अधिसूचना जाहीर करावयाची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी क्र. ४ यांचे मार्फत प्रगतीत आहे.

(३) दौंड तालुक्यातील (जि.पुणे) पेडगांव, देऊळगावराजे, खारेवाडी, सोनवडी, कानगांवस, हातवळण, पारगांव या को.प.बंधा-यांच्या बुडीत क्षेत्रामध्ये जमिनी गेलेल्या शेतक-यांना त्यांच्या बुडीत जमिनी संपादीत करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून प्रस्ताव संयुक्त मोजणी, कलम ४ इ. च्या विविध टप्यावर आहे.

---

**लातूर जिल्हयातील आरक्षित पाणी साठयातील पाण्याची चोरी झाल्याबाबत**

**(४८) १३०९ (२२-१२-२०१४). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हाधिकारी, लातूर यांनी उन्हाळ्यातील संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेऊन सात महिन्यांपूर्वी देवर्जनसह उदगीर तालुक्यातील वाढवणा बु. येथील तेरु मध्यम प्रकल्प, पिंपरी पाझर तलाव, एकुर्कारोड तलाव, कल्लूर तलाव, जंगमवाडी तलाव, गुरधाळ तलाव, करखेली साठवण तलावातील उपलब्ध पाणी आरक्षित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार पाणी उपसा बंद करावा असे आदेश असून विशेषत: देवर्जन मध्यम प्रकल्पातील आरक्षित पाणी सात महिन्यांत उचलले गेले नाही असे असतानाही ७ प्रकल्पांचे लाखो लीटर पाणी चोरी झाल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू पाणी चोरणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०३-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सिंधुदुर्ग-कोल्हापूर हे जिल्हे जोडणारा सोनवडे घोडगे घाट रस्त्याच्या मंजूरीबाबत

**(४९) १३२६ (२४-१२-२०१४). श्री. वैभव नाईक (कुडाळ), श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग-कोल्हापूर हे जिल्हे जोडणारा सोनवडे घोडगे रस्ता सर्वेक्षण होऊनही त्यांस अद्यापही मंजूरी दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घाट रस्त्यास मंजूर न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर रस्त्यांचे काम पूर्ण होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदरचे काम पूर्ण होण्याकरीता शासनाकडून किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०३-२०१५) :** (१) होय.

(२), (३) व (४) प्रश्नांकित घाट रस्त्याच्या आखणीमध्ये वनजमिनीकरिता आवश्यक ती मंजूरी प्राप्त झाल्यावर तसेच भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होताच निधी उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**माटुंग्याच्या इस्टीट्युट ऑफ केमीकल टेक्नॉलॉजीचे कुलगुरु डॉ.गणपती यादव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(५०) १३६७ (२२-१२-२०१४). श्री. शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री. हितेंद्र ठाकूर (वसई), श्री. विलास तरे (बोईसर), श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री. वैभव पिचड (अकोले), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१३-१४ मध्ये अभियांत्रिकी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमामध्ये सुमारे ५२ हजार ४०० जागा रिक्त राहील्या होत्या तसेच इतरही अभ्यासक्रमांमध्ये रिक्त जागांची संख्या लक्षणीय होती, त्यामुळे अभियांत्रिकी पदवीकांचाच नव्हे तर, औषध निर्माण शास्त्र, व्यवस्थापन आदी तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांच्या प्रश्नावर काय करता येईल यावर विचार करण्यासाठी माटुंग्याच्या इन्स्टिटयूट ऑफ केमीकल टेक्नॉलॉजीचे कुलगुरु डॉ.गणपती यादव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीच्या अहवालातील मुख्य शिफारशी काय आहेत व त्यानुसार कोणकोणते निर्णय घेतले आहेत,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०४-२०१५) :** (१) होय.

(२) डॉ.जी.डी.यादव, कुलगुरु, रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील तज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालात प्रामुख्याने व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील मंजूर प्रवेशक्षमतेच्या तुलनेत रिक्त जागांचे प्रमाण, शैक्षणिक दर्जा, गुणवत्ता टिकविण्यासाठी शिफारशी केल्या आहेत. त्यापैकी काही शिफारशींची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या शिखर संस्था, शासन, विद्यापीठ व संचालक, तंत्र शिक्षण यांच्या स्तरावरुन करावयाची आहे. सदर अहवाल स्विकारण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.